MHRT070008942025

प्रकरण दाखल तारीख : २२/०७/२०२५

प्रकरण नोंद तारीख : २२/०७/२०२५

निकालाची तारीख : **०७/०४/२०२६**

कालावधी : वर्षे – महिने – दिवस
००  ०८  १६

**भाग अ**

**चिपळूण येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र.२ यांचे न्यायालयात**

( पिठासीन अधिकारी युवराज चंद्रकांत पाटील )

**संक्षिप्त फौजदारी खटला नं.४८८/२०२५**

**निशाणी नं.१३**

**( अलोरे शिरगाव पोलीस ठाणे गु.र.नं.४७/२०२५)**

**अभियोग पक्ष** :- **महाराष्ट्र सरकार तर्फे**
**प्रमोद आनंदा वायदांडे,** वय २९ वर्षे,
रा.पो.अलोरे शिरगाव पोलीस ठाणे,
ता.चिपळूण, जि.रत्नागिरी.

**प्रतिनिधित्व** :- सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.आर.वनकर

**-विरुध्द-**

**बचाव पक्ष** :- **संतोष सखारामराव शिंदे,** वय-५२ वर्षे,
रा.देऊळवाडी, कादवड,
ता.चिपळूण, जि.रत्नागिरी.

**प्रतिनिधित्व** :- विधीज्ञ श्री. आर.व्ही.बापट

**भाग ब**

| | |
|---|---|
| गुन्हा दिनांक | २८/०६/२०२४ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | २८/०६/२०२५ |
| दोषारोप पत्र दाखल दिनांक | २२/०७/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २७/११/२०२५ |
| न्याय निर्णय राखीव दिनांक | ------- |
| न्याय निर्णय दिनांक | ०७/०४/२०२६ |

| | |
|---|---|
| शिक्षा दिल्याचा दिनांक, दिली असेल तर | ------- |

**आरोपींचा तपशील**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक दिनांक/ भा.ना.सु.सं. कलम ३५/३ प्रमाणे नोटीस | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप | शिक्षा दिली अथवा मुक्त केले | काय शिक्षा दिली | भा.ना.सु.सं. क.४६८ प्रमाणे आरोपीचा कारागृहातील कालावधी वजावट होण्यास पात्र आहे का |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संतोष सखारामराव शिंदे | २८/०६/ २०२४ | २३/०९/ २०२५ | ६५ (ई) महाराष्ट्र मदयनिषेध अधिनियम, १९४९ | निर्दोष मुक्त केले | निर्दोष मुक्त केले | --- |

**भाग क**

**अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी**

| क्रमांक | नाव | साक्षीदाराचा प्रकार |
|---|---|---|
| १. | सुनिल भिमराव मोहीते | घटनास्थळ व जप्ती पंच |
| २. | प्रशांत पोपट चव्हाण | घटनास्थळ व जप्ती पंच |

अभियोग पक्षाचा पुरावा नि.१ वरील दि.०६.०२.२०२६ रोजीच्या आदेशाने बंद करण्यात आला. आरोपीतर्फे कोणताही पुरावा घेण्यात आला नाही.

**अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालय निशाणी यादी**

**अ. अभियोग पक्ष**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १ | ८ | घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील पंचाची सही |
| २. | ९ | घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील पंचाची सही |

**न्यायनिर्णय**

( दिनांक ०७/०४/२०२६ रोजी जाहीर )

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे,**

दि.२८.०६.२०२४ रोजी १२.४५ वा. कागदवड, देऊळवाडी, ता. चिपळूण येथे आरोपी ५ लि. मापाच्या सफेद रंगाच्या प्लॅस्टीकच्या कॅन त्यात ३ लि. गावठी हातभट्टी दारु असा एकूण ४५०/- गावठी हातभट्टीची दारु विनापरवाना चारेटी

विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगताना मिळून आला. म्हणून गु.र.नं.४७/२०२५ ने फिर्याद दाखल केली.

२) गुन्ह्याचा तपास वा.के.हुंबरे पो.हे.कॉ. यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी फिर्यादी व साक्षीदारांचे जबाब नोंदवले. तसेच घटनास्थळ/जप्ती पंचनामा तयार केला. तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावा आढळून आल्याने त्याचेविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

३) आरोपी न्यायालयात हजर झाल्यानंतर त्यांना त्यांच्यावर ठेवण्यात आलेल्या गुन्ह्याचा तपशील नि.०७ अन्वये समजावून सांगणेत आला. आरोपीने गुन्हा कबूल करण्यास नकार दिल्याने त्याचेविरुध्द खटला चालविण्यात आला.

४) अभियोग पक्षाच्या पुराव्यादरम्यान आरोपीविरुध्द पुरावा आढळून न आल्याने त्यांचा फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ चे कलम ३१३(१)(ब) अन्वयेचा जबाब नोंदविण्यात आला नाही.

५) वरील सर्व बाबींचा विचार करता खालील वादप्रश्न खटल्याच्या निर्णयाकरीता उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे देत आहे.

| क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.२८.०६.२०२४ रोजी १२.४५ वा. कागदवड, देऊळवाडी, ता. चिपळूण येथे आरोपी ५ लि. मापाच्या सफेद रंगाच्या प्लॅस्टीकच्या कॅन त्यात ३ लि. गावठी हातभट्टी दारु असा एकूण ४५०/- गावठी हातभट्टीची दारु विनापरवाना चारेटी विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगताना मिळून आला म्हणून महाराष्ट्र मदयनिषेध कायदा, १९४९ चे कलम ६५(इ) | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | नुसार गुन्हा केला असे अभियोग पक्ष शाबीत करतो का ? | |
| २. | अंतीम आदेश काय ? | **आरोपीस निर्दोष मुक्त केले.** |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्र.१ व २ :**

**६)** अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता व आरोपी तर्फे विधीज्ञाचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षातर्फे दोन पंच साक्षीदार यांची साक्ष घेण्यात आली आहे. या व्यतिरीक्त अभियोग पक्षाने फिर्यादी, तपासीक अमंलदार व इतर साक्षीदार यांना तपासण्यात आलेले नाही. अभिलेखावर रासायनिक तपासणी अहवाल दाखल नाही. त्यामुळे अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द पुरावा सिध्द होईल असा कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

**७)** पंच साक्षीदार यादी क्र.१ सुनिल भिमराव मोहीते यांच्या सरतपासात असे आले आहे की, पोलीसांनी त्यांना कादवड येथे बोलावले होते व त्यांना थांबवून सही करण्यास सांगितली, पण ती कशावर व कशासाठी केली हे त्यांना सांगता येणार नाही. सदर साक्षीदार हे अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे त्यांना उत्तर सुचक प्रश्न विचारण्यात येवून देखील आरोपी विरुध्द कोणताही सबळ पुरावा आढळून आलेला नाही. तसेच दुसरे पंच साक्षीदार क्र.२ प्रशांत पोपट चव्हाण हे देखील अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे त्यांना देखील उत्तर सुचक प्रश्न विचारुन देखील आरोपी विरुध्द कोणताही सबळ पुरावा आढळून आलेला नाही.

**८)** सदर प्रकरण पडताळून पाहिले असता, आरोपीविरुध्द दोषसिध्दी होण्याइतपत पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. तसेच फिर्याद हि फिर्यादीकडून व जप्ती पंचनामा तपासी अंमलदाराकडून अभियोग पक्षास शाबीत करता आला नाही. त्यामुळे

एकूण मुद्देमाल रक्कम रु.४५०/- मात्र चा असून प्रकरण संक्षिप्तरित्या चालविणे असल्यामुळे आरोपीच्या ताब्यातून जप्त केलेला मुद्देमाल मदयनिषेध कायदयातीलच आहे किंवा कसे, तसेच सदरील मुद्देमाल हा देशी दारु आहे किंवा कसे याबाबत शंका निर्माण होते. सदर बाब अभियोग पक्ष संशयाच्या पलीकडे जाउन सिध्द करु शकलेला नाही. त्यामुळे संशयाचा फायदा मिळण्यास आरोपी पात्र आहे. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ करीता पुढील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

**(१)** आरोपीस भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(१) प्रमाणे, महाराष्ट्र मदयनिषेध अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वयेच्या गुन्हयामधून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

**(२)** गु.र.नं.४७/२०२५ अलोरे शिरगाव पोलीस स्टेशन मधील जप्त मुद्देमाल अपील कालावधीनंतर नाश करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क, रत्नागिरी यांना पाठविण्यात यावा.

**(३)** आरोपीचा वैयक्तीक जातमुचलका रद्दबातल करणेत येतो.

**(४)** भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ प्रमाणे रक्कम रु.५०,०००/- मात्रचा जामिन कदबा अथवा वयैक्तीक जातमुचलका द्यावा.

( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला )

Digitally signed by YUVRAJ CHANDRAKANT PATIL
Date: 2026.04.07 17:46:38 +0530

चिपळूण
दिनांकः- ०७/०४/२०२६

(युवराज चंद्रकांत पाटील)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, चिपळूण.

## - प्रमाणपत्र -

मी हमी देतो की, सदरच्या पी. डी. एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयामधील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | एम.इ.आरेकर, लघुलेखक श्रेणी–३ |
| **न्यायालयाचे नाव** | **सह दिवाणी न्यायालय क.स्तर, चिपळूण, ता.चिपळूण जि.रत्नागिरी.** |
| न्यायनिर्णय घोषीत दिनांक | ०७.०४.२०२६ |
| न्यायिक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | ०७.०४.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केलेले दिनांक | ०७.०४.२०२६ |